जा.क्र. माध्य.३(१४)/माशानु/पुवि/०५
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 30 SEP 2005

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

विषय : माध्यमिक शाळेचे नुतनीकरण करण्याबाबत.
राजा श्री शिवराय प्रतिष्ठान, पुणे

संदर्भ : १) शासन पत्र क्रं. माशानु १००५/(६४६/२००५/माशि-१
दिनांक ३१/८/२००५
२) शिक्षण सचांलनालयाकडील पत्र क्रं. माशानु/६३६२४/शिउसंपु/२००५
/२/१५ क (०५)१०८३५-३६ दिनांक १९/९/२००५

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये कळविण्यात येते की राजा श्री शिवराय प्रतिष्ठान, पुणे या संस्थेच्या शाळेस शासन पत्र क्र. नमाशा १०००(३३०/२०००)/माशि-१ दिनांक ७/८/२००१ सन २००० - २००१ या शैक्षणिक वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली होती. सदर शासन आदेशाचे सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून नूतनीकरण करण्यास, नेहमीच्या अटी व शर्ती च्या अधीन राहून शासनास सादर केलेल्या शिफारशीनुसार संदर्भीय पत्रान्वये शासनाने परवानगी देण्यात येत असल्याचे कळविले आहे.

शासन आदेशानुसार संस्थेस कळविण्याची कार्यवाही आपले स्तरावरुन पूर्ण करावी. संबंधित संस्थेने नुतनीकरणाने शाळा सुरु केलेली असल्याने आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची तपासणी करुन मुद्देनिहाय तपासणी अहवालासह तसेच आपल्या अभिप्रायासह प्रस्ताव विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

स्थळप्रतीवर मि. ह मं सही
सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत - माहितीस्तव सविनय सादर
१. मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२
२. मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक)
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १
३. निवडनस्ती